Balaji AMINES LIMITED
...A Speciality Chemical Company

# बालाजी अमाईन्स लिमिटेड

CIN No : L24132MH1988PLC049387

**नोंदणीकृत कार्यालय:** बालाजी टॉवर्स, क्र. ९/१ ए / १, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर, महाराष्ट्र ४१३२२४
दूरध्वनी: ००९१-२१७-२३१०८२४/२४५१५००, फॅक्स: ००९१-२१७-२४५१५२१,
ई-मेल: cs@balajiamines.com संकेतस्थळ: www.balajiamines.com

## ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, रिमोट ई- मतदान आणि बुक क्लोजर

याद्वारे सूचना देण्यात येते की बालाजी अमाईन्स लिमिटेड ('कंपनी') च्या सभासदांची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमाद्वारे (''ओएव्हीएम'') सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी, शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता (भा. प्र . वे.) आयोजित करण्यात येत आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या (यापुढे ''एमसीए'' असा उल्लेख) जनरल परिपत्रक क्रमांक ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ आणि भारतीय प्रतिभूति व विनिमय बोर्ड (''सेबी'') चे परिपत्रक SEBI /HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/२०२४/१३३ दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ (यापुढे ''परिपत्रके'' असा उल्लेख ) च्या तरतुदींनुसार, कंपन्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमाद्वारे भागधारकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सामायिक ठिकाणी एजीएम आयोजित करण्याची परवानगी आहे. त्यामुळे, २८ मे, २०२५ च्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी, कंपनीची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमाद्वारे आयोजित केली जात आहे.

उपरोक्त परिपत्रकांचे पालन करून, ज्यांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी सहभागीकडे नोंदणीकृत आहेत अशा सर्व भागधारकांना एजीएमची सूचना आणि २०२४-२०२५ आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती १५ जुलै,२०२५ रोजी पाठवल्या गेल्या आहेत. सदर एजीएमची सूचना आणि २०२४-२०२५ आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल कंपनीच्या www.balajiamines.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (''एनएसडीएल'') च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध आहे. १५ जुलै, २०२५ रोजी ईमेलद्वारे एजीएमच्या सूचना पाठवल्या गेल्या आहेत.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ चे पालन करून, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० नुसार, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार आणि सेबी (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम २०१५, च्या नियम ४४ नुसार एनएसडीएलद्वारे पुरविण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली (''ई- मतदान'') वापरुन एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान करण्यासाठी सुविधा सभासदांना पुरविली आहे. सभासदांचा मतदानाचा हक्क १ ऑगस्ट, २०२५ रोजी (''कट-ऑफ डेट'') कंपनीचे त्यांच्याकडे असलेल्या इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात असेल. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरमच्या गणनेच्या हेतुसाठी व्हीसी सुविधेद्वारे भागधारक सहभाग होतील.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ च्या तरतुदींनुसार आणि तेथे लागू असलेल्या नियमांनुसार, ३७ व्या एजीएमच्या उद्देशाने सदस्यांची नोंदणी आणि कंपनीचे शेअर ट्रान्सफर बुक्स, शनिवार, २ ऑगस्ट २०२५ ते शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५ पर्यंत बंद राहतील (दोन्ही दिवसांचा समावेश).

रिमोट ई-मतदान कालावधी मंगळवार, ०५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल आणि गुरुवार, ०७ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता संपेल, या कालावधीदरम्यान, सभासद त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करू शकतात. त्यानंतर एनएसडीएलद्वारे रिमोट ई- मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. डीमटेरिअलाइज्ड मोड, फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण केलेल्या भागधारकांसाठी आणि ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी दूरस्थपणे मतदान करण्याची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली आहे. कंपनीच्या वेबसाइटवरही तपशील उपलब्ध करून दिला जाईल. जे सभासद व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहतील आणि रिमोट ई-मतदान द्वारे ठरावांवर आपले मत दिलेले नसेल, ते एजीएम दरम्यान त्यांच्या रिमोट ई-मतदान प्रणालीवर मतदान करण्यास पात्र असतील.

एजीएमपूर्वी ज्या सभासदांनी रिमोट ई-मतदानद्वारे आपले मत दिलेले आहे ते एजीएममध्ये व्हीसी / ओएव्हीएमद्वारे उपस्थित राहू शकतात / भाग घेऊ शकतात परंतु त्यांना त्यांचे मत पुन्हा देण्याचा अधिकार असणार नाही.

कोणतीही व्यक्ती जी कंपनीचे भाग घेते आणि कंपनीद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेपर्यंत म्हणजेच १ ऑगस्ट २०२५ पर्यंत शेअर्स धारण करतात, ते www.evoting.nsdl.com यांना विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापि, रिमोट ई-मतदानासाठी ते आधीच एनएसडीएलकडे नोंदणीकृत असल्यास, ते मतदान करण्यासाठी त्यांचा सध्याचा लॉगिन आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात. रिमोट ई-मतदानाशी संबंधित तपशीलांसाठी, कृपया एजीएमची सूचना पहा.

रिमोट ई-मतदानाशी संबंधित काही शंका असल्यास, कृपया www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध शेअरधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान यूज़र मॅन्युअलला भेट द्या किंवा टोल फ्री नंबर १८००-२२२-९९० वर संपर्क साधा किंवा आम्हाला evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवा किंवा सुश्री पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल किंवा श्री. अमित विशाल, सहाय्यक उपाध्यक्ष, एनएसडीएल यांच्याशी pallavid@nsdl.co.in किंवा amitv@nsdl.co.in वर नियुक्त ईमेल आयडीवर संपर्क साधु शकता.

भागधारक ज्यांनी डिमॅट स्वरुपामध्ये भाग धारण केलेले आणि त्यांचे केवायसी तपशील अपडेट केलेले नाहीत त्या भागधारकांना त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटमार्फत त्यांच्या डिपॉझिटरीसह ई - मेल आणि इतर केवायसी तपशील नोंदणीकृत करण्याची विनंती केली जाते. समक्ष स्वरूपामध्ये भाग धारण करणारे आणि त्यांचे केवायसी तपशील अपडेट केलेले नसलेल्या भागधारकांनी त्यांचे ईमेल, बँक तपशील, खाते तपशील आणि इतर केवायसी तपशील कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (''आरटीए''), व्हेंचर कॅपिटल आणि कॉर्पोरेट इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड, ऑरम, दरवाजा क्रमांक 4-50/P- II/57/4F आणि 5F, प्लॉट क्र. 57, 4था आणि 5वा मजला, जयाभेरी एन्क्लेव्ह फेज-II, गच्चीबोवली, हैदराबाद, तेलंगणा - 500018, ईमेल आयडी: investor.relations@vccipl.com, दूरध्वनी: 040-23818475/23868257/35164940 कडे अपडेट करण्यासाठी फॉर्म ISR-1 सबमिट करण्याची विनंती केली आहे. तुम्हाला योग्यरित्या भरलेला फॉर्म info@vccipl.com वर ईमेल करण्याची विनंती केली जाते. यामुळे भागधारकांना वार्षिक अहवाल २०२४-२०२५ च्या इलेक्ट्रॉनिक प्रती आणि एजीएमची सूचना, VC आणि ई-मतदानाच्या प्रक्रियेद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहण्याच्या सूचना मिळू शकतील. हे शेअरधारकांना त्यांच्या बँक खात्यात लाभांशाचे इलेक्ट्रॉनिक क्रेडिट प्राप्त करण्यास सक्षम करेल. केवायसी अपडेट करण्याचा तपशील www.balajiamines.com/investor-relations.php वर कंपनीच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

एजीएमचा तपशील कंपनीच्या www.balajiamines.com वेबसाइटवर, एनएसडीएल www.evoting.nsdl.com वेबसाइटवर, बीएसई लिमिटेड च्या www.bseindia.com वेबसाइटवर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**ठिकाण :** सोलापूर
**दिनांक :** १५ जुलै,२०२५

**बालाजी अमाईन्स लिमिटेड करिता**
सही/-
**अभिजीत कोठाडिया**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**